# नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


## पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९७८ /२०२५ दि.१४ /०८/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी,** नौपाडा वाहतूक उपविभागाचे हद्दीत १) हनुमान मंदिर, हरिनिवास सर्कल ते फॉरेस्ट ऑफिस, २) एम.टी.एन.एल. गेट ते मावळी मंडळ शाळा तसेच ३) भगवती शाळा मागील गेट ते आशु अपार्टमेंट विष्णु नगर या रोडवर रिक्षा, दुचाकी, चारचाकी तसेच खाजगी व ४०७ टेम्पो तसेच इतर वाहने अनावश्यकरित्या तसेच बेशिस्तिने उभी केल्यामुळे सदर रोडवर वाहतूकीस अडथळा निर्माण होवुन मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | हरिनिवास सर्कल ते फॉरेस्ट ऑफिस पर्यंत दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने टि.एम.टी. व खाजगी बसेस, ४०७ टेम्पो तसेच त्यावरील जड/अवजड वाहने | नो पार्किंग | २०० मीटर | २४ तास |
| २ | एम.टी.एन.एल.गेट ते मावळी मंडळ शाळे पर्यंतच्या रोडवर दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना | नो पार्किंग | ५० मीटर | २४ तास |
| ३ | भगवती शाळा मागील गेट ते आशु अपार्टमेंट विष्णु नगर पर्यंत रोडच्या डाव्या बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना | नो पार्किंग | १५० मीटर | २४ तास |

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि नौपाडा वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.